पेडर रोड स्थित आशा भोसलेंच्या प्रभुकुंज जवळच्या फुलांच्या दुकानात आशाजींसाठी फुलं घ्यायला गेलो तर त्याने फुलांची किंमत दुप्पट सांगितली. मी त्याच्यावर जवळजवळ ओरडलोच. तेव्हा तो हसत म्हणाला, 'साहेब निदान या चार दिवसात तरी मला कमवू द्या. तुम्ही आशाजींना भेटायला जाताय ना, ज्यांना दादासाहेब फाळके ॲवॉर्ड मिळाला...' मी अचंबित झालो.

पुष्पगुच्छ घेऊन आशाजींच्या घरी पोहोचलो तेव्हा त्या हसत म्हणाल्या, 'आज तुमच्या फुलांना इतका सुगंध कसा? मी चेष्टा केली हं!' त्यांनी हसत स्पष्टीकरण दिलं. त्या पुढे म्हणाल्या– दादासाहेब फाळके ॲवॉर्ड मिळालाय मला पण माझ्या आनंदात जणूकाही सगळा देशच सहभागी झालाय असं मला वाटतं. चाहत्यांची पत्रं, फोन्स, अभिनंदनाच्या तारा आणि इ-मेलसुद्धा. मग मी स्वतःला विचारलं, असं का? लोक इतके आनंदी का झाले आहेत?



अजून बराच प्रवास बाकी आहे - आशा

आज इतकी वर्षं मी संगीताची आराधना करतेय. आजपर्यंत मला अनेकदा फिल्मफेअर आणि स्टेट ॲवॉर्ड मिळालेले आहेत. पण दादासाहेब फाळके ॲवॉर्ड इतक्या वर्षांत का नाही मिळाला. ५४ वर्षं सातत्याने या चित्रपटसृष्टीत राहूनही माझी दखल या पुरस्कारासाठी इतक्या उशिराने घ्यावीशी का वाटली. सगळ्या लोकांच्या मनात हाच प्रश्न राहून राहून उठतोय. झारीतल्या कोणत्या शुक्राचार्यांचा यामागे हात आहे? पण आता या सगळ्या प्रश्नांचा ऊहापोह करण्याची गरज नाही. शेवटी खऱ्याचाच विजय झालाय. आणि मला दादासाहेब फाळके ॲवॉर्ड घोषित झाल्यावर लोकांच्या मनातले प्रश्नही संपले असतील. म्हणूनच तर ते इतके आनंदी आहेत.


दादासाहेब फाळके पुरस्कार मला मिळाल्यामुळे या पुरस्काराचा सन्मान वाढलाय असं मी म्हणणार नाही. मी स्वतःला तेवढी मोठी समजत नाही. पण एक गोष्ट मात्र नक्की, इथे पुरस्कार किंवा लाईफ टाईम अचिव्हमेंटसारखा सन्मान माणसाला तो या व्यवसायातून निवृत्तीच्या वाटेवर असताना मिळतो. पण मला मात्र तो तरुणपणीच मिळालाय (हसते). होय, मी अजून म्हातारी झालेली नाही. अजूनही मी भरपूर गाते. माझ्या मनासारखं काम करते. हा पुरस्कार मिळाल्यामुळे माझा उत्साह वाढलाय. त्यामुळे मी आता पुरस्कार घेईन आणि घरात स्वस्थ बसेन असं कोणी समजू नये.




दादासाहेब फाळके पुरस्कार तर मिळाला पण गायिका म्हणून मी संगीतातील सर्वोच्च शिखर गाठलंय? नाही. मला अजून बराच प्रवास करायचा आहे. मैलाचे दगड पार करायचे आहेत. आजपर्यंतच्या प्रवासात मी चित्रपटगीतं गायली, नाट्यगीतं गायली, क्लासिकल गायली, तशी उडती गीतंही गायली, तरीही मला अजून बरंच गायचं आहे. आता कुठे माझा व्याप खऱ्या अर्थाने वाढायला लागलाय. माझ्याकडे काम भरपूर आणि वेळ कमी अशी अवस्था आहे.

आज मी हिंडतीफिरती आणि गातीसुद्धा आहे. पुरस्कार घेण्यासाठी स्वतः स्टेजवर जाऊ शकते. मला कोणाच्या आधाराची गरज नाही. हे काय थोडं आहे?

माझ्या मते हा पुरस्कार प्रत्येकाला त्याच्या कार्यकालातच मिळालेला चांगला. जसा तो मला मिळालाय. उतार वयात



सुरीला मंगेशकर परिवार: मीना, आशा, लता, हृदयनाथ आणि उषा



संगीतातील त्रिकुट: संगीतकार (पंचमदा), गायिका (आशा) आणि गीतकार (गुलजार)

गाणी माझ्याकडून गाऊन घेतली. आणि मग तो सिलसिला सुरूच झाला. म्हणूनच माझ्याइतकाच हा पुरस्कार मिळाल्याचा त्यांनाही आनंद होणं स्वाभाविक आहे. दुसरा फोन आला तो स्टार टेलिव्हिजनच्या समर खानचा. आणि मग अभिनंदनाचे फोन सारखे खणखणत होते.

पण माझी प्रतिक्रिया मात्र फार विचित्र होती. ज्या बातमीसाठी माझं अभिनंदन होतंय ती ऑफिशियली माझ्यापर्यंत पोहोचलीच नव्हती. आणि मग खात्री करून घेण्यासाठी मी दीदी (लता मंगेशकर) कडे गेले. तेव्हा त्यांनी बातमी खरी असल्याचा निर्वाळा दिला. त्या म्हणाल्या, 'हा पुरस्कार इतरांपेक्षा वेगळा आहे. इथे तुमच्या नावाची घोषणा करण्यापूर्वी तुम्ही किंवा निवृत्तीनंतर तो मिळाला तर त्यातली सगळी गंमतच निघून जाते. थोडक्यात आज मिळालेल्या या सन्मानामुळे मी भारावून गेलेय. आणि इथून पुढेही चांगली चांगली गाणी गाईन असा विश्वास तुम्हाला देते.

पुरस्कार मिळाल्याची बातमी सर्वात आधी मला बी.आर. चोप्रांकडून समजली. याबद्दल मी त्यांची आभारी आहे. माझ्या कारकीर्दीतही गायिका म्हणून मला खरा ब्रेक चोप्रासाहेबांच्या चित्रपटातूनच मिळाला. त्यावेळी लतादीदी, गीता रॉय आणि शमशाद बेगम या गायिका आघाडीवर होत्या. पण माझं नाव मात्र कुठेही नव्हतं. त्या काळात त्यांनी सगळ्यांचा सल्ला धुडकावून *नया दौर*ची काही



“

५४ वर्षं सातत्याने या चित्रपटसृष्टीत राहूनही माझी दखल या पुरस्कारासाठी इतक्या उशीराने घ्यावीशी का वाटली. सगळ्या लोकांच्या मनात हाच प्रश्न राहून राहून उठतोय. झारीतल्या कोणत्या शुक्राचार्यांचा यामागे हात आहे.

”

(पान नं. १३४ वर)



प्रत्येक सुख-दुःखात आशाला मैत्रीच्या नात्याने आधार देणारे बी. आर. चोप्रा

(पान नं. ८४ वरून)

तो स्वीकारताय की नाही असं विचारलं जात नाही. बस्स पुरस्कार जाहीर केला जातो. मग तो तुम्ही स्वीकारा नाहीतर नाकारा.'

प्रसारमाध्यमांनी या बातमीने आणि नंतरच्या मुलाखतींनी मला जो सन्मान दिला त्यामुळे मला आनंद झाला. आठवडाभर मुलाखती देऊन देऊन आता माझा घसाही बसलाय. पण म्हणून मी कोणाला परत पाठवून नाराज करत नाही. आणि आता या बातमीला आठवडा उलटल्यानंतर मी स्वतःला घरात कोंडून घेतलं. कारण मला आराम करायचा आहे. माझ्या कार्यक्रमांसाठी मला थोडा फार रियाज करायचा आहे. त्यासाठी आवाज पुन्हा खुलणं महत्त्वाचं आहे.

या वयात मला कोणत्याही मोठ्या पुरस्काराची अपेक्षा नव्हती. म्हणूनच चोप्राजींनी जेव्हा पुरस्काराची बातमी दिली तेव्हा ती मला खोटी वाटली. पण वर्तमानपत्रातही ठळकपणे छापून आल्यावर मला त्यावर विश्वास ठेवावा लागला.

आज मला माझे पती गणपतराव भोसले यांची आठवण आली. त्यांनी मला नेहमीच गाण्यासाठी प्रोत्साहन दिलं. ते म्हणायचे, 'तू पेरत रहा, आज ना उद्या चांगलं रोप जरूर



दोन उत्तुंग व्यक्तिमत्त्वः
इंदिरा गांधी - आशा भोसले

येईल आणि अखेरीस ते रोप उगवलं. १९५१-१९५२ मध्ये त्यांनी दिलेला सल्ला आज फळाला आला. मी तर नेहमीच असा विचार करते की आपण आपलं काम करत राहावं. फळ देणं ईश्वरावर सोपवलं आहे.

पुरस्कार मिळाल्यावर सर्वांनीच माझं अभिनंदन केलं पण गुलजारभाईंनी पाठवलेला संदेश मी कधीच विसरणार नाही. त्यांनी लिहिलं होतं, 'तुम इतनी उचाई पर पहुंच गई हो की अब तुमसे मिलना पहले से भी मुश्कील हो गया है. इसलिए बधाई फॅक्स से भेज रहा हूं.' यावर मी उत्तरादाखल असा फॅक्स पाठवला, 'इस जगह पर पहूंचने के लिए मुझे आपके 'चाँद' को पार करना पडा.' याचा अर्थ त्यांच्या गीतात नेहमीच कुठेतरी चाँद असायचा. जसं चाँद की मिसरी, चाँद को चबाना, चाँद का टुकडा वगैरे वगैरे...

दादासाहेब फाळके पुरस्काराची गोष्ट चालली आहे तर दोन शब्द त्यांच्याविषयी बोलणंही उचित ठरेल. ते नसते तर मी काय पण कोणीच इथे नसतं. कदाचित ही फिल्म इंडस्ट्री सुरूच झाली नसती. ज्या प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी या इंडस्ट्रीचा पाया घातला तो कौतुकास्पद आहे. त्यांच्याप्रमाणेच मीही महाराष्ट्रीय आहे आणि मला त्याचा अभिमान आहे. आज त्यांच्या नावाचा पुरस्कार मला मिळाला, मी धन्य झाले!

अमरीश पुरीजींनी फोनवर अभिनंदन केलं आणि म्हणाले, एका रविवारी वेळ काढून आमच्या आर्टिस्ट असोसिएशनला भेट द्या. माझा सत्कार करू इच्छितायत. कितीतरी संस्थांनी माझा सत्कार करण्याची इच्छा व्यक्त केली. पण मी नम्रपणे सगळ्यांना नकार दिला. माझ्यावरचं त्यांचं प्रेम हाच मोठा सत्कार आहे. असं मी मुद्दाम सांगते. कारण नाव, प्रतिष्ठा या गोष्टी काही काळापुरत्या असतात. माझं स्वतःचंच उदाहरण घ्या. मी कितीतरी उन्हाळे-पावसाळे पाहिलेत. जेव्हा माझी गाणी फारशी लोकप्रिय नव्हती त्या मधल्या काळात लोक मला पार विसरून गेले होते. म्हणूनच मी कोणत्याही परिस्थितीत स्थितप्रज्ञ राहण्याचा प्रयत्न करते.

यश हे उगवत्या सूर्यासारखं असतं. जेव्हा ते मिळतं तेव्हा तुमच्या आजूबाजूला प्रकाश असतो. पण मावळतं तेव्हा लोक खुशाल तुमच्या अंधाऱ्या आयुष्याकडे पाठ फिरवून निघून जातात. यासाठी मला एक चांगलं शे[illegible] सुचतंय...

शोहरत की बलंदी भी
पल भर का तमाशा है
जिस डाल पे बैठे हो
वो टूट भी सकती है

जी के पाठकोंको 2001 की दीपावली की शुभकामनाएँ